जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मराठा आंदोलकांच्या २ वाहनावर नगर – कल्याण रोडवर दगडफेक

## एका वाहनाच्या काचा फुटल्या, एक जखमी, आंदोलकांचीही दगड फेकणाऱ्या युवकाला मारहाण

(पान १ वरुन)

मनोज जरांगे पाटील यांचा ताफा रात्री उशिरा नगर जिल्ह्यात दाखल झाला तर तो पुढे कल्याण रोड मार्गे नगर जिल्हा हद्द ओलांडायला पहाट उजाडली. दरम्यान जरांगे पाटील यांच्या ताफ्याच्या पुढे दुपारपासूनच गावागावातील अनेक आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना झालेले आहेत. अशाच काही आंदोलकांच्या गाड्या नगर – कल्याण रोडने जात असताना रात्री ९ च्या सुमारास टाकळी ढोकेश्वर गावातील पारनेर चौकात आंदोलकांच्या एका गाडीचा रस्ता ओलांडणाऱ्या एका मोटारसायकलला कट बसला. त्यामुळे मोटारसायकल वरील आकाश अनिल थोरात (वय २६, रा. टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर) याने त्या वाहनचालकाला जाब विचारला. त्यावेळी त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली.

काही वेळात प्रकरण शिवीगाळ करण्यावर गेले. त्यावेळी तेथे अजून काही आंदोलकांच्या गाड्या आल्या. या दोघांमध्ये सुरु असलेले भांडण हाणामारीपर्यंत गेले. त्यावेळी इतर आंदोलक त्या वाहनचालकाच्या मदतीला धावले व त्यांनी आकाश थोरात यास मारहाण केली. या रागातून आकाश याने रस्त्याच्या कडेला असलेले दगड घेवून वाहनचालकाच्या दिशेने फेकून मारले. त्यामुळे एका वाहनाच्या काचा फुटल्या. त्यात एक वाहन चालक जखमी झाला. त्यामुळे आकाश याला पुन्हा मारहाण करण्यात आली.

### दगड फेकून मारणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

ही माहिती मिळताच त्या परिसरात बंदोबस्तासाठी असलेले पो.हे.कॉ.वैराळ, पो.कॉ.रविंद्र साठे, सतीश शिंदे यांनी तेथे धाव घेत आकाश यास ताब्यात घेतले. मारहाणीत तो जखमी झालेला असल्याने त्याला पारनेर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पुढे ग्रामीण रुग्णालयाने त्यास पुढील उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात रेफर केल्याने त्याला नगरला नेण्यात आले आहे.

या प्रकरणी काचा फुटलेल्या वाहनचालकाने पोलिसांकडे फिर्याद न देता ते तसेच पुढे निघून गेल्याने सरकार तर्फे पो.कॉ. रविंद्र साठे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून दगडफेक करणारा आकाश अनिल थोरात याच्या विरुद्ध पारनेर पोलिस ठाण्यात बीएनएस कलम १२५ जिल्हाधिकारी यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचे महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३७ (१)(३) चे उल्लंघन करणे या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गैरसमजुतीतून घडला प्रकार, अफवा न पसरविण्याचे आवाहन

मराठा आंदोलकाच्या वाहनावर दगड फेकून मारल्याची घटना घडलेली आहे. मात्र हा प्रकार मोटारसायकलला कट मारल्याच्या कारणावरून, वैयक्तिक वादातून घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले असल्याचे पारनेर पोलिसांनी सांगितले. कदाचित गैरसमजुतीतून हा प्रकार घडला असण्याची ही शक्यता आहे. त्यामुळे मराठा आंदोलनाला गालबोट लागल्याच्या अफवा कोणीही पसरवू नये, असे आवाहन पारनेर पोलिसांनी केले आहे.

# सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्याच्या कारणास्तव सरपंचपद रद्द

नगर – सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण केल्याच्या कारणास्तव चिचोंडी पाटील, ता. जि. अहिल्यानगरचे सरपंच शरद खंडू पवार यांचे पद जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी रद्द केल्याची माहिती माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी दिली आहे.

सविस्तर माहिती देताना श्री. भद्रे यांनी सांगितले की शरद खंडू पवार यांनी काही वर्षांपूर्वी चिचोंडी पाटीलच्या एस.टी. स्टँड वरील सार्वजनिक रस्त्यावर गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मंडप टाकला. मंडपामधे शहीद महेंद्रकुमार सुदाम नालकुल आणि हाडांचे तज्ञ कै. पैलवान रामरावदादा पवार यांचे फोटो लावून शरद खंडू पवार यांनी चिचोंडी पाटीलच्या ग्रामस्थांची सहानुभूती मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. गावातील लोकांना सदर मंडप गणेशोत्सवापुरताच राहील असे वाटले. मात्र शरद पवार यांनी मंडप न काढता आणि सार्वजनिक रहदारीचा रस्ता रिकामा न करून देता तेथे पत्र्याचे मोठे शेड उभे करून हरी ओम रियल इस्टेट नावाने ऑफिस थाटले. यासोबतच खरेदीखत नसलेल्या मस्जिद इनाम देवस्थानच्या जागेतच बांधलेल्या बंगल्याच्या समोर जाण्या येण्यासाठी कॉंक्रीटचा रस्ता तयार केला. बंगल्याच्या मागील बाजूस शासनाच्या निधीतून तयार केलेल्या रस्त्यावर जनावरांसाठी दावण बांधली. या दावणीला बांधलेल्या जनावरांमुळे गावकऱ्यांना अडथळा निर्माण व्हायचा. शरद पवार यांच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये गावातीलच एका व्यक्तीला चार चाकी गाडीने जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा ३०७ चा गुन्हा सुद्धा दाखल आहे. गावकरी कुणीही समोर येऊन बोलत नव्हते. त्यामुळे ही तीनही अतिक्रमणे काढण्यासाठी सरपंच शरद पवार यांना आपण तोंडी व लेखी सांगितले असता त्यांनी ही बाब मानली नाही. उलट भद्रे कुटुंबीयांनी सार्वजनिक रस्ता अडवून अतिक्रमण केल्याचे बदनामीकारक व्हिडिओ सोशल मीडियावर टाकले आणि भद्रे यांचे नसलेले अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हा परिषद, अहिल्यानगर समोर २०.०१.२०२५ रोजी उपोषण केले. यावेळी गावातील ग्रामस्थांनी सुद्धा शरद पवार यांचे अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हा परिषद, अहिल्यानगरसमोर त्याचदिवशी आंदोलन केले. चार दिवस चाललेल्या दोन्ही आंदोलनांचा निर्णय देते वेळी पंचायत समिती मार्फत चौकशी अधिकारी नेमण्यात आले. चौकशी अधिकारी यांनी भद्रे यांचे अतिक्रमण तुर्त सिद्ध होत नसल्याने आणि यासाठी महाराष्ट्र शासन संपादित गावठाण क्षेत्र ४.०० हे. ची मोजणी करून हद्द निश्चिती करण्याचा आदेश दिनांक ५.२.२०२५ रोजी दिला. भद्रे यांचे अतिक्रमण नसल्याने व मोजणी केली तर सरपंच यांचाच बंगला अतिक्रमणात असल्याचे सिद्ध होणार असल्याने सरपंच, चिचोंडी पाटील यांनी आजपर्यंत मोजणी केलेली नाही. ग्रामस्थांनी सरपंच शरद पवार यांचे विरुद्ध केलेल्या तक्रार अर्जा प्रमाणे चौकशी अधिकारी यांनी पाहणी केली असता तीनही ठिकाणी अतिक्रमण असल्याचे सप्रमाण सिद्ध झाले.

अतिक्रमणाचा हा अहवाल आपण जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे सादर केला असता सरपंचपद जाण्याच्या भीतीने शरद पवार यांनी दावण काढून टाकली. त्याचप्रमाणे पद वाचविण्यासाठी एसटी स्टॅण्डवरील अतिक्रमण केलेच नाही असा बनाव केला. यासाठी ग्रामपंचायतीच्या सदस्यांना व ग्रामविकास अधिकारी यांना सुद्धा वेठीस धरण्यात आले. सर्व काही ज्ञात असूनही त्यांनी अतिक्रमण नसल्याचा खोटा पंचनामाकरून खोटी कागदपत्र तयार केली. पुन्हा जेव्हा चौकशी अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांचे मार्फत अतिक्रमणे आहेत का हे पाहण्यासाठी पाठविले असता आधी दावण होती मात्र आता काढलेली आहे व इतर अतिक्रमणे तशीच असल्याचा अहवाल चौकशी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना सादर केला.

एवढा सगळा द्राविडी प्राणायाम करूनही आमचे वकील ॲड. सचिन चांगदेव इथापे आणि त्यांचे सहकारी ॲड. रणजीत पांडुरंग ताकटे यांनी सर्व बाजू न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर आणि पुरावे तपासून पाहिल्यानंतर शरद पवार हे सरपंच पदासाठी अपात्र असल्याचा लेखी निकाल दिल्याची माहिती सुधीर भद्रे यांनी दिली आहे.

# कामगारविरोधी धोरणांमुळे कर्मचाऱ्यांचे भवितव्य धोक्यात

## रिक्त पदे भरण्यासह कंत्राटी कामगारांना कायम करण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन करणार : एन.एम. पवळे

नगर – कास्ट्राईब महासंघाने पूर्वी अनेक यशस्वी लढे उभारले असल्याचे सांगून, कामगार विरोधी धोरणांमुळे कर्मचाऱ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. अशा वेळी सर्व कर्मचाऱ्यांनी संघटनेबरोबर एकजुटीने उभे राहून आपले हक्क मिळवले पाहिजेत, असे आवाहन राज्याध्यक्ष एन.एम. पवळे यांनी केले.



कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ (पुणे) केंद्रीय कार्यकारणी बैठकीत बोलताना राज्याध्यक्ष एन.एम. पवळे. समवेत महासचिव देवानंद वानखडे, अतिरिक्त महासचिव डॉ. अनिल पांडे, उपमहासचिव सुहास धिवर, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष विलास जगताप, सहसचिव निवृत्ती आरू, विभागीय अध्यक्ष ना.म. साठे, डॉ. सुशील सुर्यवंशी (जालना), कोषाध्यक्ष किशोर राजगुरू, जिल्हाध्यक्ष के.के. जाधव, राज्य उपाध्यक्ष वसंतराव थोरात, बुध्दानंद धाडोंरे आदी.

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची केंद्रीय कार्यकारिणी बैठक शहरात उत्साहात पार पडली. या बैठकीत शासनाच्या कामगार विरोधी धोरणाच्या विरोधात ठाम भूमिका घेत राज्यव्यापी आंदोलन करण्याचा ठराव एकमुखीने मंजूर करण्यात आला. नोकर भरती, पदोन्नती, आरक्षण, तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरून कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करण्याचा ठराव बैठकीत घेण्यात आला.

कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ (पुणे) केंद्रीय कार्यकारणी बैठक राज्याध्यक्ष एन.एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी महासचिव देवानंद वानखडे, अतिरिक्त महासचिव डॉ. अनिल पांडे, उपमहासचिव सुहास धिवर, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष विलास जगताप, सहसचिव निवृत्ती आरू, विभागीय अध्यक्ष ना.म. साठे, डॉ. सुशील सुर्यवंशी (जालना), कोषाध्यक्ष किशोर राजगुरू, जिल्हाध्यक्ष के.के. जाधव, राज्य उपाध्यक्ष वसंतराव थोरात, बुध्दानंद धाडोंरे, महिला जिल्हाध्यक्षा नदांताई भिगारदिवे, नाशीक विभाग कार्याध्यक्ष राजीव साळवे, महसूल भूमि अभिलेख अध्यक्ष आरीफभाई शेख, शहराध्यक्ष दत्ता रणसिंग, शाम गोडळकर, जिल्हा कार्याध्यक्षा कुंदाताई क्षेत्रे, शाम थोरात, जिल्हा कार्याध्यक्ष समिर वाघमारे, बाळासाहेब शिंदे आदींसह महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करून व दिवंगत पदाधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहून बैठकीला सुरुवात झाली. मागील सभेतील इतिवृत्ताचे वाचन प्रा. सुहास धीवर यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी कामगारांच्या हक्कांवर तडजोड न करता, संघर्ष सुरू असल्याची भावना व्यक्त केली.

बैठकीत शासकीय व निमशासकीय कार्यालयातील नोकर भरती व पदोन्नती आरक्षणाचे काटेकोर पालन करण्याची मागणी करण्यात आली. कंत्राटी नोकर भरती करताना मागासवर्गीयांचे आरक्षण तंतोतंत अंमलात आणावे, इंग्रजी माध्यम शाळांतील नियुक्त्यांमध्ये आरक्षण लागू करावे, तसेच सध्या कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कर्मचारी–अधिकाऱ्यांना कायम करावे, यावर एकमत झाले. यासोबतच जातीचे बनावट दाखले सादर करून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याबाबत महासंघ पुढाकार घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच संघटनेच्या पुढील राज्य अधिवेशनाबाबतही सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीत केंद्रीय कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हानिहाय आढावा घेऊन नवीन पदाधिकाऱ्यांना मान्यता देण्यात आली. महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी विशेष समिती गठीत करण्यात आली.

सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष के.के. जाधव यांनी केले. निवृत्ती आरू यांनी आभार मानले.

# पॉलिश करून देण्याच्या बहाण्याने महिलेचे पाच तोळे दागिने केले लंपास

## वसंत टेकडी परिसरातील घटना, दोन अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर – सोन्याचे दागिने पहिल्यापेक्षा जास्त उजळून देतो, असे म्हणून दोन अनोळखी इसमांनी एका ७८ वर्षीय वृध्द महिलेकडील सुमारे ५ तोळ्याचे दागिने फसवणूक करून नेल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी दुपारी वीर सावरकर मार्ग, वसंत टेकडी, सावेडी येथे घडली.

या बाबत सुमन मानिक बैरागी यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यात म्हटले आहे की, २६ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास त्या अंगणात कपडे वाळत घालत असताना दोन अनोळखी इसम घराच्या कंपाउंडमध्ये आले. त्यातील एकाने आम्ही भांड्याची पावडर विकायला आलो आहोत, याने भांडी चकाचक होतात असे सांगत त्यांचा विश्वास संपादन केला.

त्याने प्रथम घरातील तांब्याचे भांडे स्वच्छ करून दाखवले. त्यानंतर फिर्यादींच्या हातातील सोन्याच्या बांगडीवर पावडर घासून ती अधिक चमकदार झाली असल्याचे दाखवले. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने आपले हातातील, गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने एका स्टीलच्या डब्यात ठेवून त्या इसमाकडे दिले. इसमाने त्यावर पावडर टाकून झाकण लावले व पाच मिनिटांनंतर उघडा, दागिने अधिक चमकतील असे सांगून डबा परत देत दोघेही पसार झाले.

तथापि, काही वेळाने डबा उघडून पाहिल्यावर त्यामध्ये कोणतेही दागिने आढळले नाहीत. त्यानंतर वृध्द दाम्पत्याने घरभर शोध घेतला पण दागिने मिळाले नाहीत. त्यावेळी आपण फसवले गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये तीन तोळ्याच्या सोन्याच्या दोन बांगड्या, चार ग्रॅमचे सोन्याचे कानातील दोन टॉप्स व दीड तोळ्याची सोन्याची चैन यांचा समावेश आहे.

या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर अधिक तपास करीत आहेत.

# धार्मिक स्थळ तोडफोडप्रकरणी आणखी एका जणाला अटक

## न्यायालयाने सुनावली दोन दिवसांची पोलीस कोठडी

नगर – शहराच्या मध्यवर्ती भागातील पटवर्धन चौकाजवळील धार्मिक स्थळी तोडफोड केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात आणखी एकाला कोतवाली पोलिसांनी अटक केली. सचिन छबुराव दारकुंडे (रा. समतानगर, सावेडी) असे त्याचे नाव आहे. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

धार्मिक स्थळी तोडफोड केल्याची घटना २४ ऑगस्ट रोजी पहाटे तीनच्या सुमारास घडली होती. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी योगेश सखाराम झोंड (रा. धोंडेवाडी रस्ता, वाळकी, ता. नगर), जेसीबी चालक बबलु रामभाऊ पाल (रा. बोरूडे मळा, नगर, मुळ रा. बनारास, उत्तरप्रदेश) व अरूण गोविंद खरात (रा. समता चौक, सावेडी) यांना अटक केली होती.

या गुन्ह्यातील सचिन दारकुंडे, दत्ता गायकवाड व इतर संशयितांचा शोध सुरू असताना गुन्हे शोध पथकाला सचिन दारकुंडे याच्याविषयी माहिती मिळताच त्याला ताब्यात घेतले. त्याला अटक करून २७ ऑगस्ट रोजी न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेंदवाड यांनी तपासकामी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून इतर संशयितांचा शोध सुरू आहे.

# ननुबाई चोपडा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – नक्षत्र लॉन जवळील चांदी मोती कॉलनीतील रहिवासी ननुबाई विजयकुमार चोपडा (चिचोंडी पाटीलवाला) (वय ६१) यांचे २८ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. एलआयसीचे विजयकुमार हिरालाल चोपडा यांच्या त्या पत्नी तर सुमित चोपडा (चिचोंडी पाटील) यांच्या मातोश्री होत.

# अरुण साळुंके यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – स्टेशन रोडवरील जय मल्हार चौकातील रहिवासी अरुण मारुती साळुंके (वय ७८) यांचे २२ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर रेल्वे स्टेशन अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, २ मुले, १ बहिण, नातवंडे असा परिवार आहे. मिनीनाथ व अशोक साळुंके यांचे ते वडील होत.

# उडान प्रकल्पातंर्गत वीर पत्नींना 'मोफत व्यावसायिक प्रशिक्षण' देणार

## प्रकल्पाचा शुभारंभ, सेवाप्रीतच्या आत्मनिर्भरतेसाठी पुढाकार

नगर – वीर पत्नींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आणि त्यांना आर्थिक व सामाजिक बळकटी देण्याच्या उद्देशाने सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने शहरात उडान प्रकल्पाचा शुभारंभ झाला. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या जवानांच्या वीर पत्नींना या प्रकल्पातून मोफत विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील ४० वीर पत्नींची निवड करण्यात आली असून, त्यांना फॅशन डिझाईनिंग, ब्युटी पार्लर व्यवसाय, सौंदर्य प्रसाधन विक्री अशा विविध क्षेत्रांतील प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणामुळे महिलांना स्वावलंबी होण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सेवाप्रीतच्या अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख अर्चना खंडेलवाल, अश्विनी झरेकर, गीता नय्यर, सारिका मुथा, बबीता जग्गी, वस्तीगृहाच्या अधीक्षक श्रद्धा भोसले, सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी चंद्रकांत पवार, वीर पत्नी अंबिका पोंदे आदींसह ग्रुपच्या महिला सदस्या व वीर पत्नी उपस्थित होत्या.


सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या वतीने शहरात उडान प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

बबीता जग्गी यांनी वीर पत्नींना आनंदी जीवन जगण्यासाठी लाईव्ह चेंजिंग हॅपिनेस संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी वीर पत्नींचा सन्मान करण्यात आला. या प्रशिक्षणात अश्विनी झरेकर व्यावसायिक प्रशिक्षणाबद्दल मार्गदर्शन करणार आहेत. हे प्रशिक्षण जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात चालणार आहे.

जागृती ओबेरॉय म्हणाल्या की, देशाच्या सुरक्षिततेसाठी आपले पती गमावलेल्या वीर पत्नींचा त्याग समाज कधीही विसरणार नाही. अशा महिलांना आधार देऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी प्रेरित करण्याची जबाबदारी समाजाची आहे. उडान प्रकल्प हे त्या दिशेने उचललेले पाऊल आहे. वीर पत्नींनी यापुढे कोणावरही अवलंबून न राहता स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अर्चना खंडेलवाल म्हणाल्या की, देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही; मात्र त्यांच्या पत्नींना सबलीकरणाद्वारे समाजात आपले स्थान निर्माण करून देणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी या उपक्रमाचे कौतुक करुन महिलांनी वीर पत्नींसाठी घेतलेला उपक्रम दिशादर्शक असल्याचे स्पष्ट केले. या उपक्रमासाठी अर्चना कुलकर्णी, लता राजोरिया, ममता मेहरवाल, बबीता खंडेलवाल, रेखा बंब, देवकी खंडेलवाल, ज्योती गांधी, नीता बंब, विद्या धोकरीया, राजश्री खंडेलवाल, सीमा खंडेलवाल, सविता खंडेलवाल, मंजू झालानी, अंजू गुजराती, संतोष झालानी, जया झालानी, अंजली महाजन, राजशाही रजनीस, सोनल लोढा, सुरेखा मुनोत, वंदना गांधी, सोनल जखोटिया, श्रेया खंडेलवाल, शिल्पा शिंगवी, शिल्पा पोरे, सारिका साळवे, राखी कोठारी, पूजा भळगट, नयना भंडारी, नीलम खंडेलवाल, कल्पना खंडेलवाल, मीरा धोकरीया, मंजू खंडेलवाल, डिंपल शर्मा, चंदा गांधी, अनुजा जाधव, चित्रा आदी महिला प्रयत्नशील आहेत.

यु फोम, बॉन्डेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, फर्निशिंग क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, फ्रेमसह नविन सोफा तयार करुन मिळेल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

आपल्या आहारातील अनेक पदार्थांबाबत आपल्या मनात गैरसमज असतात, भात हा त्यातलाच एक. भातामुळे लठ्ठपणा येतो किंवा भातामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते असा आपल्याकडे समज आहे. मात्र भारतात आजही दक्षिण भागात किंवा कोकणासारख्या भागात भात हेच मुख्य अन्न आहे. याठिकाणी कायम तांदूळाचे पदार्थ खाल्ले जातात. पूर्वीच्या काळीही मोठ्या प्रमाणात भात खाल्ला जायचा. पण अशा कायम भात खाण्याने या लोकांना काही त्रास होत नाही हे दिसून येते. लठ्ठपणा हे अनेकांचं भात न खाण्याचं प्रमुख कारण आहे. भातातील एक संयुग तुमचं हृदय निरोगी राहण्यासाठी मदत करतं. म्हणूनच जपानमध्ये हृदयरोगानं दगावलेल्या लोकांची संख्या फार कमी आहे. असे नुकतेच एका संशोधनातून समोर आले आहे. तांदूळामध्ये फायबर आणि प्रोटीनचे प्रमाण जास्त असल्याने तो आरोग्यासाठी चांगला असतो असेही काही संशोधनातून समोर आले आहे.

आजच्या काळात एक अशी सवय लोकांच्या जीवनाची शत्रू बनली आहे जी खूप सामान्य आहे आणि ती म्हणजे सतत बसण्याची सवय. जेव्हा तुम्ही बराच वेळ बसता तेव्हा तुमचे मोठे पोश्चरल स्नायू स्विच ऑफ मोडमध्ये जातात. ज्यामुळे अर्ध्या तासात तुमचा चयापचय ९०% कमी होतो. कमी स्नायूंच्या हालचालींमुळे ग्लुकोज बिघडतो, ज्यामुळे रक्तातील साखर वाढते आणि अस्वास्थ्यकर लिपिड प्रोफाइल होते. ही लक्षणे मेटाबॉलिक सिंड्रोमची लक्षणे आहेत, ज्यामुळे धमन्यांमध्ये प्लेक जमा होण्यास गती मिळते. यासाठी स्टँडिंग डेस्क वापरा किंवा बसण्याचे आणि उभे राहण्याचे संतुलन ठेवा.

## पाककला

### शाही लस्सी

**साहित्य** – जाड व गोड दही १ कप, बेदाणे, पिस्ते, बदाम, अक्रोड यांची जाडसर व मिश्रपूड १ टीस्पून, प्रत्येकी १ चिमूट वेलची व जायफळ पूड, देशी गुलाबाच्या ४-५ पाकळ्या, चवीप्रमाणे साखर, थोडे लोणी, बर्फ चुरा.

**कृति** – दह्यात जेमतेम १ टी स्पून थंड पाणी, मसाला पुडी व साखर घाला. खूप घोटा. उंच ग्लासात बर्फाचा चुरा घाला. त्यावर ही लस्सी ओता. त्यावर थोडे ड्रायफ्रुटस् व गुलाबाच्या पाकळ्या घाला. त्यावर लोणी, थोडे फेटून घाला व प्या.

## वास्तू

* कन्या दर्शनावेळी कन्येने फिक्कट पिवळे किंवा गुलाबी वस्त्र धारण करावे. कन्येच्या शयनगृहात शंकर-पार्वती किंवा महालक्ष्मी-विष्णूची तस्वीर असावी. बाहेरच्या कक्षात मोर-लांडोर किंवा हंस-हंसिणीची जोडी असावी.

* **तुळशी वनस्पती विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता वाढवणे, अभ्यासाशी संबंधित क्रियाकलाप आणि बौद्धिक क्षमता वाढवणे यासारख्या गोष्टींना मदत करतात.**

* **जेव्हा वास्तु मार्गदर्शक तत्त्वांनुसार मनी प्लांट, बांबू किंवा जेड लावले जाते तेव्हा असे मानले जाते की ही झाडे संपत्ती, आर्थिक वाढ आणि विपुलता आकर्षित करू शकतात.**

## सौंदर्य

* त्वचेवर दररोज मध लावल्यास त्वचेवरील डाग कमी होतात. तसेच त्वचेचा रुक्षपणाही नाहीसा होतो.

* मुलतानी माती आणि गुलाब पाण्यात ऑलिव्ह ऑईल मिसळून बनवलेली पेस्ट चेहऱ्यावर दीड तास लावावी याने त्वचेचा कोरडेपणा दूर होईल.

## सल्ला

* स्टीलची भांडी, सिंक व नळाच्या तोट्या इ. स्वच्छ करण्यासाठी सोडा वापरा.

* साधारण फ्रिजऐवजी ५ स्टार रेटेड फ्रिजची निवड केली तर विजेचे बील ३० टक्क्यांनी कमी होईल आणि पैसेही वाचतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५**

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, स्वाती ११।३९, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आर्थिक नुकसान संभव. कामात गुप्तता राखा. सहयोग मिळेल. संबंध बिघडतील. अव्यवहारिक कामांपासून लांब रहा.

**वृषभ** : वैचारिक असंतोष राहील. कामात मन रमणार नाही. तब्बेतीची काळजी घ्या. व्यावसायिक प्रकरणात अडचणी येतील.

**मिथुन** : उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. मनोरंजनात वेळ जाईल. अडचणी राहतील.

**कर्क** : आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिक दृष्टा वेळ सामान्य. कामाचा ताण जाणवेल.

**सिंह** : खासगी कामाकडे जास्त लक्ष द्या. पैसा मिळेल. जबाबदारीची कामे पडतील. नोकरीत नुकसानी संभव.

**कन्या** : शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मन रमणार नाही. विश्वास कमी राहील. व्यर्थ ताण जाणवेल.

**तूळ** : मार्ग प्रशस्त होईल. अडकलेली कामे पूर्ण झाल्याने आनंद वाटेल. साथ लाभेल.

**वृश्चिक** : अडकलेला पैसा मिळेल. गूढ अनुसंधान करणाऱ्यांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील.

**धनु** : आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील. आपल्या प्रयत्नांमुळे व्यापारात वृद्धि होईल.


**मकर** : आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. लाभाच्या संधी. नवीन ओळखी संभवतात.

**कुंभ** : संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. वेळेचे सदुपयोग केल्याने यश मिळेल.

**मीन** : आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता. कामाला वाव मिळेल. गुंतवणूकीतून लाभ होण्याची शक्यता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२०३ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) नाना पाटेकर, रवीना टंडन, परेश रावल यांचा एक चित्रपट ५) ++ जमाना (चित्रपटाचे नाव) ६) ++ बॉस (चित्रपटाचे नाव) ८) उधार का ++++ (चित्रपटाचे नाव) ९) ++ अग्निहोत्री (अभिनेत्री) १०) गीत ++ पत्थरोंने (चित्रपटाचे नाव) ११) एक प्रसिद्ध दिवंगत पार्श्वगायक १२) मेरी ++ (चित्रपटाचे नाव) १३) ++ कागज (चित्रपटाचे नाव) १५) ++ दिन बहार के (चित्रपटाचे नाव) १६) अमिताभ बच्चन, शशी कपूर, रेखा यांचा एक चित्रपट १७) देव आनंद, वैजयंतीमाला, अशोककुमार, तनुजा यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** १) मिथुन चक्रवर्ती, पूजा भट्ट, अतुल अग्निहोत्री, किरणकुमार यांचा एक चित्रपट २) फिर वही दिल ++ हूं (चित्रपटाचे नाव) ३) कमल हसन, रती अग्निहोत्री यांचा एक गाजलेला चित्रपट ४) नंदिता दास, शबाना आझमी यांचा एक चित्रपट ७) अनित गुहा, मनहर देसाई यांचा एक चित्रपट १२) हाथी ++ ++ (चित्रपटाचे नाव) १४) 'एक दूजे के लिये' चित्रपटातील कमल हसनचे नाव १५) ++ और शोला (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : तुमचे मन तुम्हालाच जपायला यायला हवे, ते दुसऱ्याने जपावे अशी अपेक्षा ठेवणे चुकीचेच आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नखे कापताना दुखत नाहीत, पण उपटल्यास दुखतात; असे का?

दर आठवड्याला तुम्ही नेलकटरने नखे कापत असाल. चांगलीच सवय आहे ही. पण केव्हा तरी नख कापताना नख कापण्याऐवजी उपटले गेल्याने वा ओढले गेल्याने तुम्हाला नक्कीच दुखले असेल. अगदी ब्लेडने नख कापले तरी रक्त येत नाही वा दुखत नाही. मग उपटल्यावर वा ओढल्यावर ते का दुखते? याचे उत्तर कळण्यासाठी नखाची रचना समजून घ्यायला हवी!

नखे, केस, घामाच्या ग्रंथी, तैलग्रंथी हे त्वचेचेच भाग आहेत. त्वचेतील पेशींपासून निर्माण होणाऱ्या केरॅटीनच्या जाडसर थराने नख तयार होते. वरची बाजू सोडल्यास उर्वरीत तिन्ही बाजूंनी नखाभोवती त्वचेच्या घड्या असतात. केरॅटीनच्या थराला वेदनेची जाणीव नसते, कारण तो मृत भाग असतो. त्यात सजीव पेशी नसतात. नखात पोषणासाठी रक्तवाहिनी नसते किंवा संवेदना जाणवण्यासाठी मज्जातंतूही नसतात. त्यामुळे नख कापले तरी दुखत नाही. नखाच्या बोटाकडच्या भागाला नखाचे मूळ म्हणतात. येथूनच पेशींच्या थरापासून नखाची निर्मिती होत असते. या भागातील पेशी मात्र जिवंत असतात व त्यांना रक्तपुरवठा आणि मज्जातंतूंचाही पुरवठा असतो. नखाचा आपल्याला न दिसणारा आतला भाग त्याखालील नाजूक त्वचेत गुंतलेला असतो. साहजिकच नख उपटल्यास वा ओढले गेल्यास वेदनेची जाणीव होते. नखे कापताना मात्र आपण नखाचा निर्जीव भागच कापत असतो, त्यामुळे दुखत नाही.

### संत मच्छिंद्रनाथ

एकदा रागाच्या भरात शिव कैलास आणि गौरी यांना सोडून एका निबिड जंगलात येऊन राहिले आणि त्यांनी तेथेच समाधी लावली. गौरीने शोध घेऊनसुद्धा शिव सापडले नाही. इतक्यात अचानक नारदमुनी तेथे आले. गौरीची व्यथा ऐकून त्यांनी अंतज्ञानाने शिवांचा शोध घेऊन त्यांचे बसण्याचे ठिकाण तिला सांगितले. गौरीने शिवांसमोर भिल्लिणीच्या वेषात जाऊन संगीतप्रधान नृत्याला सुरुवात केली.

त्या आवाजाने शिवांची समाधी उतरली. त्यांनी स्मित करत तिला विचारले, शाबरी, तू मला दिव्यसमाधीतून जागृत का केलेस ? तेव्हा शाबरी म्हणाली, आपण वर्षभर मला सोडून या समाधीवस्थेत कसे राहिलात, या गोष्टीचे मर्म मला जाणून घ्यायचे आहे. शिव म्हणाले, सांगेन; परंतु आता इथे नाही. जेथे मानवाची वस्ती नसेल आणि जेथे ते रहस्य कुणी ऐकणार नाही, अशा ठिकाणी मी ते तुला सांगीन. काही दिवस गेल्यावर गौरीने शिवांला त्या गोष्टीची आठवण करुन दिली. शिव तिला घेऊन निबिड जंगलात यमुनानदीच्या किनारी आले आणि ते समाधीचे गूढ तिला शाबरी भाषेत सांगू लागला; कारण शाबरी हीच गौरीची मातृभाषा होती.

त्याच वेळी यमुना नदीतील एका मत्स्यीने ब्रह्मतेज गिळले होते. कवी नारायणांनी त्या देहात जीवरूपाने प्रवेश केला आणि तिचा गर्भ दिसामासी वाढू लागला. शिव सांगत असलेले गूढ मत्स्यीच्या पोटात असलेल्या मच्छिंद्रनाथांनी ऐकले. भगवान शंकराने आपल्या उपदेशाचे सार पार्वतीला विचारताच मच्छिंद्रनाथ मत्स्यीच्या पोटातून म्हणाले,

'सर्वत्र एक ब्रह्मच भरून राहिले आहे, हेच आपल्या उपदेशाचे सार आहे.'

हे वाक्य ऐकताच कवी नारायण मत्स्यीच्या पोटी जन्म घेणार असल्याचे शंकराने ताडले आणि त्यांना खूप आनंद झाला.

शिव म्हणाले, मच्छिंद्रा, तुम्ही पुढे बद्रिकाश्रमी आल्यावर याच मंत्राचा उपदेश मी दत्तात्रेयांच्या मुखातून तुम्हाला करवीन. मच्छिंद्रनाथांना आशीर्वाद देत त्यांनी त्यांना हठयोगाचा उपदेश केला आणि जीवब्रह्माची सेवा करण्यास सांगितले. त्यानंतर पूर्णमास भरताच मत्स्यीच्या उदरातून एका तेजस्वी बालकाचा जन्म झाला.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

दुनिया, जो दुःख-दर्दो से भरी हुई है, जब हम इस दुनिया में किसी जीवित महापुरुष, किसी संत-महात्मा, किसी साधु की शरण में पहुँचते हैं, तो जिस आग में हम जल रहे होते हैं, उसमें पानी की सी बौछार हो जाती है, आत्मा को शांति मिल जाती है, ठंडक मिल जाती है। वह ठंडक हमें कैसे मिलती है ? वे हमें right understanding (सही समझ) दे देते हैं, हमें समझाते हैं कि हमारी ज़िंदगी क्या है, परमात्मा क्या है, उससे हम कैसे मिल सकते हैं और हमारी ज़िंदगी का मक़्सद क्या है। करोड़ों लोग इस दुनिया में आते हैं, जिन्हें यह मालूम ही नहीं होता कि वे इस दुनिया में क्यों आये हैं और वह समझ हमें तभी आती है, जब हम किसी महापुरुष की शरण में पहुँचते हैं। वह समझ पढ़ने-लिखने से नहीं आती, वह अभ्यास के ज़रिये आती है और वह समझ हमारे रोम-रोम में तभी समाती है, जबकि कोई महापुरुष उसे सही तरीके से हमें समझा दे। वह समझाने का तरीका क्या है ? हर एक महापुरुष हमें यही बता गए हैं कि जब हम किसी जीवित महापुरुष के चरणों में पहुँचते हैं, रूहानियत उनकी आँखों से टपकती है, उनकी नज़रों से हमारी नज़रों तक, उनकी आँखों से हमारी आँखों तक, उनके दिल से हमारे दिल तक, उनकी रूह से, उनकी आत्मा से हमारी आत्मा तक पहुंचती है। इसीलिए बार-बार धर्मग्रंथों में आया है कि हम सत्संगों में जायें क्योंकि सत्संग एक मतवालों की महफ़िल है, जहाँ पर प्रभु के प्यारे इकट्ठे होते हैं। संत दर्शनसिंह जी महाराज ने फ़रमाया है :

**महफ़िले हल्क़:-ए अरबाबे-जुनूँ है '**
**दर्शन' बैठ जाए जो यहाँ, एहले नज़र हो जाए**
**ताओ नूर, .**

ग़ज़ल-२५

सत्संग प्रेमियों की एक सभा है, एक महफ़िल है, कौन से प्रेमियों की? जो प्रभु के प्रेमी हैं, जो प्रभु से एकमेक होना चाहते हैं; वे लोग जो सत्संग में पूरी एकाग्रता से बैठते हैं। इसीलिए संत कृपालसिंह जी महाराज कहा करते थे कि जब भी हम सत्संग में आयें, हमें अपना ध्यान उस महापुरुष में लगाना चाहिए, जिस महापुरुष के सत्संग में हम बैठे हैं क्योंकि वे कहा करते थे कि दो-तिहाई रूहानियत नज़रों के ज़रिये मिलती है । यही संत दर्शनसिंहजी महाराज फरमा रहे हैं कि जब हम सत्संग में आते हैं, तो जो radiation (विकिरण), जो charging (सिद्धि) हमें मिलती है, उससे ही हमें सही समझ मिलती है, उससे ही हमारी समझ ठीक होती है और जब हमारी समझ ठीक होगी, तो हमारे विचार भी ठीक होंगे, हमारे बोल भी ठीक होंगे, हमारे कार्य भी ठीक होंगे।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

एकदम पवित्र, शान्त और शक्तिशाली वातावरण में फसल बढ रही है। घर में बैठे भी अपने सूक्ष्म फरिश्ते स्वरूप द्वारा खेती में पहूँचकर स्नेह और प्रेम से, श्रेष्ठ शक्तिशाली संकल्पों से सकाश देना है। किन्हीं और विशेष आत्माओं का भी आवाहन करके जमीन और फसल को सकाश दे सकते हैं।

कोई भी फफूंदी, रोग या कीट का असर फसल पर दिखाई दे तो तुरंत पवित्र स्वरूप में स्थित होकर, पवित्रता के सागर परमात्मा की पवित्र किरणें फसल को दें, फिर शक्तियों की किरणें दें।

समय अनुसार खेती में पन्द्रह दिन में या मास में एक बार संगठित रूप से योग करने से वायुमण्डल को शुद्ध और शक्तिशाली बनाने में मदद मिलती है। यह ऐसे ही आत्मा के मूल गुणों पर आधारित

### आज्ञा चक्र

राजयोग का अभ्यास करना है। अपने (आत्मा के) सात गुणों के वायब्रेशन का जमीन और फसल को कैसे लाभ होता है, यह देखते हैं।

**१) ज्ञान स्वरूप :-** जब हम आत्मा ज्ञान स्वरूप होकर ज्ञान सूर्य परमात्मा की याद में एकाग्र होकर फसल को शुभ भावनाओं के साथ अर्जी डालते हैं तो उसी अनुसार फसल द्वारा प्रतिक्रियायें मिलती हैं। आत्मा द्वारा निकलने वाले वायब्रेशन जब फसल तक पहुँचते हैं तो वनस्पति के अन्दर की सर्व क्रियायें प्रेरणात्मक रूप से होने लगती हैं। जमीन से अन्न घटक जड़ों द्वारा पत्तों तक जाना, अन्न का तैयार होना और तैयार हुआ अन्न अपनी जगह तक पहुँचना इस कार्य में कोई भी रुकावट नहीं आती है।

वनस्पति में अन्न की वृद्धि के कार्य में भी इस अभ्यास से ज्यादा लाभ होता है।

एक प्रयोग - एक बर्तन में पानी ले करके उसमें अपनी अंगुली रखें और अभ्यास करे कि मैं आत्मा ज्ञान स्वरूप हूँ... ज्ञान सूर्य की किरणें मुझ आत्मा द्वारा अंगुली के माध्यम से जल में उतर रही है...। दस मिनट तक इसी एक संकल्प में एकाग्र हो जायें। यह पानी जमीन अथवा फसल पर छिड़कने से हमारे श्रेष्ठ संकल्पों का प्रतिसाद बहुत अच्छा दिखाई देगा । (ध्यान रहे-जब पानी में अंगुलियाँ हों तब जरा भी संशय या व्यर्थ विचार न चले)

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

रात्री झोपताना,
मॉम म्हणते - गुड नाईट बेबी,
माँ म्हणते - शुभ रात्री बेटा,
आणि ... आई म्हणते - चुलीत घाल तो मोबाईल आणि झोप आता.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आयसीसी चॅम्पियन ट्रॉफी २०२५ करीता भारतीय संघाचे मुख्य चयनकर्ता कोण आहेत?

– अजित आगरकर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८९

# आरोग्य सखी

**१) गर्भाशय :**

आंतरजननेंद्रियांमधील गर्भाशय सर्वांत म हत्वाचा अवयव आहे. गर्भाशय उदराच्या पोकळीत अगदी मध्यभागी असते. त्याची उंची तीन इंच, रुंदी दोन इंच आणि जाडी एक इंच असते. परंतु गर्भावस्थेत याचा आकार संपूर्ण गर्भ वाढेल एवढा होतो. ही निसर्गाची किमयाच नाही का? प्रसूती झाल्यानंतर त्याचा आकार लगेच आकुंचित होऊन काही दिवसांतच प्राकृत अवस्थेत येतो. गर्भाशयाचा आकार उलट्या त्रिकोणाप्रमाणे शंखनाभी असतो. हा आकार वरील बाजूला पसरट असून खाली निमुळता होत जातो. गर्भाशय तीन आवरणांनी बनते. बाह्य आवरण पातळ पापुद्र्याचे असते. मध्य आवरण स्नायूमय असते; तर आतील आवरण एका अस्तराने (Endometrium) बनलेले असते. यामध्ये गर्भ राहतो म्हणून त्यास 'गर्भशय्या' असेही म्हणतात. गर्भाशय मध्यभागी राहण्यासाठी त्याला सर्व बाजूंनी स्नायुबंधांनी धरून ठेवलेले असते. गर्भाशयमुख हे योनिमार्गामध्ये उघडलेले असते. योनिमार्ग ३-४ इंच

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

लांबीचा असतो. तो स्नायूपासून बनलेला असतो. समागम योनिमार्गामध्येच होतो. समागम झाल्यानंतर गर्भाशयमुखाजवळच पतीचे वीर्य पडते. वीर्यामधील काही शुक्रजंतू गर्भाशयात जातात आणि गर्भवाहिनी नलिकेपर्यंत पोहोचतात. त्यातील एका 'ॲक्टिव' शुक्रजंतूचा स्त्रीबीजाशी संयोग होतो. त्यालाच फलन (Fertilisation) असे म्हणतात. त्यातून पेशीसमूह तयार होतो. हा पेशीसमूह गर्भाशयाच्या अस्तरामध्ये रुजतो आणि गर्भधारणा होते. ही क्रिया साधारणपणे मासिक पाळीच्या अठराव्या दिवसापर्यंत पूर्ण होते. समजा, गर्भधारणा झाली नाही तर महिन्याच्या शेवटी २८ ते ३० व्या दिवशी मासिक पाळीच्या स्वरूपात योनीमार्गे अस्तर बाहेर पडते. गर्भावस्थेम ध्ये गर्भाशयात गर्भधारणा होऊन नऊ महिने त्याची संपूर्ण वाढ होत असते. गर्भाची पूर्ण वाढ झाल्यानंतर साधारणतः चाळीस आठवड्यांनी गर्भाशयाचे आकुंचन सुरू होते. म्हणजेच कळा यायला लागतात व प्रसूती अवस्था सुरू होऊन गर्भ गर्भाशयमुखातून योनिमार्गाद्वारे बाहेर पडतो.

**२) बीजवाहक नलिका** (Fallopiantube) :

**बीजकोष** (Ovary) **व गर्भाशय** (Uterus) – यांच्यामध्ये बीजवाहक नलिका असते. गर्भाशयाच्या दोन्ही बाजूला एक-एक नलिका असते. बीजकोषातून बाहेर पडलेले बीज गर्भाशयात पोहोचवण्याचे काम तसेच पुरुषांच्या शुक्रजंतूंना स्त्रीबीजापर्यंत नेण्याचे काम बीजवाहक नलिका करते. या नलिकेमध्ये शुक्रजंतूंचा स्त्रीबीजाशी संयोग होऊन फलन होते. त्यानंतर फलित गर्भाला गर्भाशयात पाठवण्याचे काम ही बीजवाहक नलिका करतात. स्त्रियांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेमध्ये याच बीजवाहक नलिका बंद करतात व त्यानंतर पुढे गर्भधारणा होत नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगर शहरात खा. शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत ३० ऑगस्टला अरुण पाटील कडू यांचा 'अभिष्टचिंतन सोहळा'

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात, विजयसिंह मोहिते पाटील आदी उपस्थित राहणार




नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील सामाजिक राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणारे ज्येष्ठ नेते तथा रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण पाटील कडू यांचा अभिष्टचिंतन सोहळा ३० ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वा. सहकार सभागृह अहिल्यानगर येथे खासदार शरदचंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती निमंत्रक डॉ. सुधीर तांबे यांनी दिली आहे.

अरुण पुंजाजी पाटील कडू अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती देताना डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष म्हणून काम करताना अरुण पाटील कडू यांनी प्रत्येक तालुक्यात रचनात्मक कामांची उभारणी केली आहे. याच बरोबर आयुष्यभर शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने काम करताना रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक सहकार अशा विविध क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान असून त्यांच्या ७५ वर्षानिमित्त जिल्ह्यातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या वतीने ३० ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा सहकारी बँकेच्या सभागृहांमध्ये त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा देशाचे ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात भूषविणार असून या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, ज्येष्ठ नेते माजी खासदार यशवंतराव गडाख, खासदार निलेश लंके, पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यातील विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार रोहित पवार, आमदार मोनिकाताई राजळे, आमदार आशुतोष काळे, आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार काशिनाथ दाते, आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार संग्राम जगताप, आमदार हेमंत उगले, आमदार विठ्ठल लंघे, आमदार विक्रमसिंग पाचपुते, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी आमदार लहू कानडे, माजी आमदार शंकरराव गडाख, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार आप्पासाहेब राजळे, माजी आमदार नरेंद्र पाटील घुले, राजेंद्र फाळके, बिपिन कोल्हे, बबनराव पाचपुते, प्राजक तनपुरे, बाबासाहेब भोस, विजयराव औटी, चंद्रशेखर घुले, डॉ. एस. एन.पठाण, अशोकराव काळे, चंद्रशेखर कदम, प्राचार्य शिवाजीराव भोर, पांडुरंग अभंग, राहुल जगताप, बाळासाहेब मोठे, भाऊसाहेब कांबळे, डॉ.सर्जेराव निमसे, गीतांजलीताई शेळके, संभाजीराव फाटके, कॉम्रेड सुभाष लांडे, माजी आमदार वैभव पिचड, बाळासाहेब मुरकुटे, अशोकराव गायकवाड, फिरोजभाई तांबटकर, नंदकुमार झावरे उपस्थित राहणार आहेत.

या अभिष्टचिंतन सोहळा व शेतकरी मेळाव्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक महिला कार्यकर्ते व युवकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आमदार सत्यजित तांबे व अरुण पाटील कडू अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**संघर्ष यात्री पुस्तकाचे प्रकाशन :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान देताना सातत्याने सामाजिक बांधिलकी ठेवून पुरोगामी विचार जपणारे अरुण पाटील कडू यांच्या ७५ निमित्त राज्यभरातील विविध मान्यवरांच्या ७५ लेखांचा संघर्ष यात्री या गौरव ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीमध्ये यावेळी होणार आहे.

# 'कोर्टाच्या माध्यमातून लोकशाहीचे मजबुतीकरण'वर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांचे अहिल्यानगर शहरामध्ये ३१ ऑगस्टला व्याख्यान



नगर – अहिल्यानगर सेंट्रल ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता बडीसाजन कार्यालय, आनंदऋषी हॉस्पिटल शेजारी येथे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्वल जी. भुयान यांचे 'कोर्टाच्या माध्यमातून लोकशाहीचे मजबुतीकरण' या विषयावर व्याख्यान होणार असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी यांनी दिली.

जिल्हा न्यायालयाच्या द्विशताब्दी महोत्सवानिमित्त व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प होत असून याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती श्रीमती विभाजी कंकणवाडी, न्या. रोहित जोशी, प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू जी. शेंडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात ७५ वर्षे पूर्ण झालेल्या बारचे सभासद तसेच न्यायदान क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्यांचा सन्मान होणार आहे.

न्या. उज्वल जी. भुयान यांनी आसाम, नागालँड, मेघालय, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम, अरुणाचल या राज्यात वकिली व गुवाहाटी, अगरतळा, शिलाँग, कोहिमा, इटानगर येथील खंडपीठात यशस्वी वकिली केली आहे. ते आयकर विभागाचे वकील, सरकारी वकील, महाधिवक्ता, मुंबई व तेलंगणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणूनही कार्यरत होते. जुलै २०२३ पासून ते सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आहेत. कायदे शिक्षणाशी निगडित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध आहे.

बार असोसिएशनचे कार्यकारी समिती सदस्य व सर्व सभासद या सोहळ्याचे नियोजन परिश्रमपूर्वक करीत आहेत. या अभ्यासपूर्ण व्याख्यानाचा कायदे अभ्यासकांनी लाभ घेण्याचे असोसिएशनने आवाहन केले आहे.

# जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार पक्षाचा नगरमध्ये ३० ऑगस्टला 'कार्यकर्ता मेळावा'

नगर – अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी– शरदचंद्र पवार पक्षाचा 'कार्यकर्ता मेळावा' ३० ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजता राष्ट्रवादी भवन, अहिल्यानगर येथे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे.

या मेळाव्यासाठी जिल्हा प्रभारी अशोक पवार, खा. निलेश लंके, प्रसादराव तनपुरे, आ. रोहित पवार, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, जिल्हा निरीक्षक अंकुशराव काकडे, माजी आ. दादाभाऊ कळमकर यांच्यासह जिल्ह्यातील आजी – माजी आमदार, खासदार, प्रदेश पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, सर्व जिल्हा पदाधिकारी, फ्रंटल सेलचे जिल्हाध्यक्ष, सर्व शहराध्यक्ष यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी दिली.

# आयुष्यात प्रत्येकाने विनम्र व क्षमाशील आचरण ठेवावे : अनुपमाजी म.सा.



चातुर्मासानिमित्त आनंदधाममध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नगर – जैन धर्मियांच्या पवित्र पर्युषण महापर्वामधील सामुदायिक क्षमापना कार्यक्रम आनंदधामच्या प्रांगणात झाला. क्षमा वीरस्य भूषणम् या उक्तीला अनुसरुन उपस्थित प्रत्येकाने कळत नकळत झालेल्या चुकांबद्दल हात जोडून एकमेकांची क्षमा मागितली. 'खमाव खमाव'च्या गजरात आनंदधामचे पवित्र प्रांगण दुमदुमले होते. जैन साधूसाध्वीजींच्या सान्निध्यात हजारो भाविकांनी क्षमापना कार्यक्रमात सहभाग घेत त्यांच्या अनमोल मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

चातुर्मासानिमित्त आचार्यश्रींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आनंदधाममध्ये विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. सामूहिक क्षमापना कार्यक्रमावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., साध्वी डॉ.दर्शनप्रभाजी म.सा., डॉ. अनुपमाजी म.सा., आलोकऋषीजी म.सा. आदी साधूसाध्वीजींसह श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष बोथरा, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत व सतीश लोढा, सी .ए. रमेश फिरोदिया, अशोक पारख, सचिन जगताप, गणेश भोसले, संभाजी कदम, भगवान फुलसौंदर, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, संतोष गांधी, मनिषा मुनोत, अशोक (बाबूशेठ) बोरा, रतिलाल कटारिया, कांतीलाल गुगळे आदी उपस्थित होते.

### 'खमाव खमाव'च्या गजरात आनंदधाम येथे सामूहिक क्षमापना कार्यक्रम

यावेळी मार्गदर्शन करताना अनुपमाजी म. सा. म्हणाल्या की, मनात व्देष व क्लेष असला की जीवन अस्थिर बनते. आनंदी जीवनासाठी व्देषमुक्त व क्लेषमुक्त झाले पाहिजे. क्षमापना हे जैन धर्मातील आत्मशुध्दीचे पर्व आहे. दैनंदिन जीवन जगताना प्रत्येकाकडून अनवधानाने अथवा जाणीवपूर्वक चुका होतात. एखाद्याला अपमानास्पद बोलले जाते. यातून मनात कटुता निर्माण होते. राग लोभाचे परिमार्जन करणे व त्यासाठी क्षमा मागणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते. एखाद्याला क्षमा करणे तसेच मनापासून क्षमा मागणे ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. नम्रता व क्षमाशीलता प्रत्येकाने आपल्या आचरणात आणावी हिच क्षमापना पर्वाची मुख्य शिकवण आहे.

कुंदनऋषीजी महाराज म्हणाले की, पर्युषण पर्व प्रत्येकाला आत्मशुद्धीची संधी देते. मनापासून क्षमायाचना केल्याने आंतरिक समाधान लाभते. आनंदधाम येथे आज अतिशय पवित्र वातावरणात सामूहिक क्षमापना कार्यक्रम झाला आहे.

हस्तीमल मुनोत म्हणाले की, श्रावक संघाच्यावतीने वर्षभर धार्मिक कार्यक्रमांसाठी नियोजन केले जाते, साधूसाध्वीजींची सेवा केली जाते. या आयोजनात प्रत्येकाला समावून घेत अधिकाधिक सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न असतो. कधी अजाणतेपणी त्रुटी राहत असतील तर त्यासाठी आम्ही क्षमापार्थी असून सर्वांनी उदार अंत:करणाने आम्हाला क्षमा करावी. आचार्यश्रींच्या पावन भूमीत होत असलेला चातुर्मास व पर्युषण पर्व प्रत्येकालाच आत्मउन्नतीचा मार्ग दाखवत आहे, असे त्यांनी म्हटले.

संतोष बोथरा म्हणाले की, आचार्यश्रींच्या पावन भूमीत चातुर्मास उत्साहात पार पडत आहे. या काळात जपतप आराधना करून भाविक आत्मशुद्धीची अनुभूती घेत आहेत. पर्युषण महापर्व काळात अनेकांनी जप तप आराधना केली आहे. सर्व धार्मिक कार्यक्रम नियोजन पूर्वक होतील यासाठी श्रावक संघ प्रयत्नशील आहे. सामूहिक क्षमापना कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला आहे.

उपस्थितांनी साध्वीजींच्या प्रवचनाचे भक्तीभावाने श्रवण केले. आचार्यश्रींच्या ध्वनीमुद्रीत मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर सर्वांनी विनम्रतेने हात जोडून खमाव खमाव म्हणत एकमेकांची क्षमा मागितली. यंदा पर्युषण तपात युवक युवतींचा सहभाग लक्षणीय होता. त्यांचा श्रावक संघातर्फे सत्कार करण्यात आला. पारण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २९ ऑगस्टपासून महाआरोग्य तपासणी शिबीर

## सिटी स्कॅन १२५० रुपयांत, एमआरआय २५०० रुपयात व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जन्मजयंती निमित्त जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल ॲण्ड हार्ट सर्जरी सेंटर येथे २९ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत विविध मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची मानवसेवेची शिकवण व प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा.यांच्या प्रेरणेतून हे शिबिर घेण्यात येत आहेत. दररोज सकाळी १० ते दुपारी २ या कालावधीत रूग्ण तपासणी करण्यात येणार आहे. दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ असंख्य रूग्णांना झाला आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलला एन.ए.बी. एच.मान्यता मिळालेली असून ही मान्यता असलेले नगर जिल्ह्यातील २६० बेडस्चे हे पहिलेच हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमधील उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचा लाभ या मोफत शिबिरांतून सर्वसामान्य रूग्णांना होणार आहे. हॉस्पिटलमध्ये एमआरआय तपासणी २५०० रुपये, सर्व प्रकारचे सिटी स्कॅन १२५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, डिजीटल एक्स रे तपासणी २५० रुपयात केली जाणार आहे. हॉस्पिटलमध्ये प्रशस्त व अतिप्रगत पॅथॉलॉजी विभाग, आंतरराष्ट्रीय दर्जाची ब्लड बँक, ३५ डायलेसिस मशिन कक्ष, परिपूर्ण फिजिओथेरपी विभाग आहे.

२९ ऑगस्ट रोजी दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबिराने होणार आहे. यात लॅप्रोस्कोपीव्दारे पोटातील, बेंबी, हर्नियाची शस्त्रक्रिया १० हजार रुपये, पित्ताशय काढणे शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, स्त्रियांच्या गर्भाशयाची पिशवी काढणे १० हजार रुपये, स्टॅपलर लेझर पाईल्स शस्त्रक्रिया १५ हजार रुपये, अपेंडिक्स शस्त्रक्रिया ४ हजार रुपये, स्त्रीयांचे वंध्यत्व तपासणीसाठी ट्युबल पेटेन्सी टेस्ट २ हजार रुपये, स्त्रीयांची कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया ३ हजार रुपयांत केली जाईल. सर्व शस्त्रक्रियांसाठी औषधे, आयसीयुचा खर्च वेगळा असेल.



या शिबिरात जनरल व लॅप्रोस्क्रोपिक सर्जन डॉ.भास्कर जाधव, डॉ. राहुल कांडेकर, डॉ.महेश घुगे, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.रवींद्र मुथा, डॉ.सोनल बोरुडे, डॉ.हिरल चौधरी रूग्ण तपासणी करतील.

३० ऑगस्ट रोजी अस्थिरोग तपासणी, मणके व सांधेबदली शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. यात इंपोर्टेड इम्प्लांटसह संपूर्ण गुडघा प्रत्यारोपण, संपूर्ण खुबा प्रत्यारोपण इंपोर्टेड इम्प्लांटसह ६५ हजार रुपयांपुढे केले जाणार आहे. औषध खर्च वेगळा असणार आहे. शिबिरात अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे, स्पाईन सर्जन डॉ. अमित सुराणा, डॉ. अक्षय गादिया रुग्ण तपासणी करणार आहेत.

३१ ऑगस्ट रोजी त्वचा रोग तपासणी शिबीर होणार आहे. मुरुम, पांढरे डाग, इसब, गजकर्ण, नायटा, केसांच्या, नखांच्या समस्या, सोरियासीस, चामखीळ, कुष्ठरोगावरील तपासणी व उपचार करण्यात येतील. त्वचारोग तज्ज्ञ डॉ.भास्कर पालवे, डॉ.अमित शिंदे रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करतील.

४ सप्टेंबर रोजी पोटाचे आजार तपासणी शिबिर होईल. यात यकृत, स्वादूपिंड विकार, पोटातील कॅन्सरच्या गाठी, आतड्याचे विकार, पोटदुखी, सिडिटी, आम्लपित्त, लिव्हर इन्फेक्शन, पचनक्रियेचे विकार, अपचन, पित्ताशयातील खडे, काविळ तपासणी केली जाईल. पोटविकार तज्ज्ञ डॉ.राहुल कांडेकर, डॉ.राजेंद्र गुंजाळ रूग्ण तपासणी करणार आहेत.

८ सप्टेंबर रोजी किडनी आजार तपासणी शिबिर होणार आहे. यात अंगावर सूज येणे, लघवी कमी अथवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन केले जाणार आहे. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत केले जाईल. यात नेफ्रोलॉजीस्ट डॉ.गोविंद कासट, डॉ.प्राजक्ता पारधे रूग्ण तपासणी करतील.

९ सप्टेंबर रोजी शिबिरांची सांगता एंडो युरोलॉजीकल (मूत्रपिंड, मूत्रमार्ग, मूत्राशय), स्टोन तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराने होणार आहे. प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी उपचार केले जातील. रूग्णांवर महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. शिबिरात मूत्र विकार तज्ज्ञ डॉ. संकेत काळपांडे, डॉ.अमेय सांगळे, डॉ. स्वनित देशपांडे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

या शिबिरांचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन जैन सोशल फेडरेशनच्यावतीने करण्यात आले आहे. शिबिराची नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी ०२४१–२३२०४७३/७४/७५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे. हॉस्पिटलमध्ये २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक कार्यरत आहे.


नॉर्थ महाराष्ट्र रिजनल स्पर्धेत चमकदार कामगिरी करणारे स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीचे खेळाडू.

# नॉर्थ महाराष्ट्र रिजनल स्पर्धेत स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

नगर – महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशन अंतर्गत नॉर्थ महाराष्ट्र रिजनल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा २३ आणि २४ ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे पार पडल्या.

११ वर्षे मुलांच्या गटात अद्वैत जोशी याने रजत पदक पटकाविले. ११ वर्षे मुलींच्या गटात हिृदया भंडारे हिने रजत पदक पटकाविले. ११ वर्षे मुलींच्या गटात निरवी देवळालीकर हिने कांस्य पदक पटकाविले. १३ वर्षे मुलींच्या गटात अवंती तोरडमल हिने रजत पदक पटकाविले. महिला गटात सान्वी जाधव हिने रजत पदक पटकाविले. पुरुष गटात अभिजित ससाणे याने उपांत्यपूर्व फेरी गाठली. सर्व विजयी खेळाडूंना ट्रॉफी व रोख बक्षिस देण्यात आले.

या स्पर्धेत नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्हातून खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत ईश्वरी पाटील, वेदांत शितोळे, आराध्य भागवत, अलीअसगर टीनवाल, आदित कर्नावट या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ केला. खेळाडूंना स्मॅश टेबल टेनिस ॲकॅडमीचे मार्गदर्शन लाभले.

# मुला–मुलींच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी ३१ ऑगस्टला निवड चाचणी

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना यांच्यावतीने १० ते १५ सप्टेंबर पर्यंत होणाऱ्या १३ वर्षांखालील मुला–मुलींच्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा सोलापूर येथे होणार असून स्पर्धेकरीता अहमदनगर जिल्ह्याचा संघ पाठवायचा आहे. यासाठी अहमदनगर जिल्ह्याचा संघ निवडण्याकरीता ३१ ऑगस्ट रोजी १३ वर्षांखालील जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्पर्धेतून अहमदनगर जिल्ह्याचा संघ निवडला जाईल. स्पर्धेसाठी येताना खेळाडूंनी आधार कार्ड झेरॉक्स, जन्मदाखला झेरॉक्स व वैयक्तिक चाचणी शुल्क रक्कम रू. २०० इतके सोबत आणावेत. ही स्पर्धा सावेडी येथील जॉगिंग ट्रॅक बास्केटबॉल मैदान येथे सकाळी ९ वाजता आयोजित केली आहे. स्पर्धेसाठी सत्येन देवळालीकर (मो. ९२२६३१२५५६) व सचिन भापकर (९०२८९९०३९७) यांच्याशी संपर्क करावा.

या स्पर्धेसाठी खेळाडूंनी/संघांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे यांनी केले आहे.

# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास ६ महिन्यांची मुदतवाढ

नगर – अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने हा निर्णय जाहीर केला असून, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६) राज्यात लागू झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत. या कायद्यानुसार एसईबीसी प्रवर्गाला शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशात १० टक्के आरक्षण मिळाले आहे. तसेच, न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी–मराठा किंवा मराठा–कुणबी (ओबीसी) जातीची प्रमाणपत्रे मिळत आहेत. ही प्रक्रिया अजूनही सुरू असल्याने विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत. अशा विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

ही मुदतवाढ अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू आहे. अर्जदारांनी जात पडताळणी समितीने कार्यालयाने कळविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी, जेणेकरून समितीस विद्यार्थ्यांचे जात दावा विषयक प्रकरणावर विहित कालावधी निर्णय घेता येईल. महाविद्यालयांनी देखील शासन निर्णयाच्या सूचनांचे पालन करून विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र जमा करण्या साठी मुभा द्यावी, त्यांना तात्काळ प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत तगादा लावू नये.

शासन निर्णयात दिलेल्या सहा महिन्याच्या मुदतीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी शासन निर्णयातील सूचना प्रमाणे कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने करण्यात आले आहे.







वर्ल्ड रेकॉर्ड चे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंड चे अध्यक्ष डॉ. मनिष कुमार व उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे पुनीत बालन व संजीव जावळे यांना प्रदान केले.

# हिंदुस्थानमधील पहिल्या सार्वजनिक गणपतीची ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंसच्या वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

नगर – श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सन १८९२ मध्ये सर्वात प्रथम सार्वजनिक गणेशोत्सवाची स्थापना करून आपल्या भारतवर्षाच्या क्रांतिकारी चळवळीला सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून दिशा देण्याचे राष्ट्रकार्य केले. हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ची ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंड वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आली आहे. वर्ल्ड रेकॉर्ड चे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंड चे अध्यक्ष डॉ. मनिष कुमार व उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टचे उत्सवप्रमुख पुनीत बालन व अध्यक्ष संजीव जावळे यांना प्रदान केले.

# श्री बाबा रामदेवजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

## वार्षिक सर्वसाधारण सभा

फक्त सभासदांसाठी

श्री बाबा रामदेवजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेची सन २०२४-२०२५ सालची वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि . १०/०९/२०२५ रोजी दुपारी ०४ : ३० वाजता संस्थेत मोचीगल्ली, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती. दिनांक २८/०८/२०२५

सौ. राजश्री चौहान — सचिव
श्री.राजेश बायड — व्हा.चेअरमन
श्री.मनिष सोनग्रा — चेअरमन



रजि.नं.ए.एन.आर./ए.एन.आर./आर.एस.आर/सी.आर,/३२३९-२००२ दि.१९/०३/२००२

# सिंधु नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

दाळमंडई अहिल्यानगर-४१४००१, फोन : २३२४९११, मो.नं.७५८८३८७७७५

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सिंधु नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहमदनगर संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **२३** वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१४/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता, सिंधु मंगल कार्यालय,भुतकरवाडी, अहिल्यानगर येथे संस्थेचे व्हा.चेअरमन **मा.श्री.नवलानी ठाकुरदास ई.** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे, तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

(१) दिनांक २९/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सभेचे कार्यवृत्तांत वाचन मंजूर करणे. (२) संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२४-२०२५ सालचा अहवाल नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे. (३) सन २०२४-२०२५ या वर्षाचे वैधानिक लेखा परिक्षक यांचे ऑडिट रिपोर्टची नोंद घेणे. (४) संचालक मंडळाने सूचविलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा वाटणीस मान्यता देणे. (५) सन २०२४-२०२५ चे दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे. (६) संस्थेचे सन २०२५-२०२६ या कालावधीचे लेखापरिक्षण करणेसाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे. (७) सन २०२५-२०२६ सालासाठीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे. (८) मा.सहकार आयुक्त/निबंधक यांचे आदेशानुसार सुधारित 'आदर्श उपविधी' २०२५ स्विकृत करणे बाबत. (९) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ नुसार संस्थेच्या सभासदांसाठी आयोजित केलेले सभासद प्रशिक्षण देणे. (१०) मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

**टिप**- (१) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपूर्वी किमान ३ दिवस आधी सभासदाकडून संस्थेच्या सर्वसाधारण कामकाजासंबंधी प्राप्त झालेल्या विषयांवरच विचार करण्यात येईल. सूचना संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात जमा कराव्यात. (२) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही. यासभेत घेतलेले निर्णय सर्व सभासदांवर बंधनकारक राहतील.

स्थळ - अहिल्यानगर
दिनांक - २८/०८/२०२५

सह व्यवस्थापक
**सौ.सीमा व्ही.पंजवानी**
(मा.संचालक मंडळ यांचे आदेशानुसार)


# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध उपक्रमांसह रॅलीचे आयोजन करा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश



राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या उपक्रमांच्या आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आदी.

नगर - दरवर्षी २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून युवकांमध्ये खेळांविषयी जागृती निर्माण व्हावी व क्रीडासंस्कृती वृद्धिंगत व्हावी, यासाठी जिल्हाभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व एकविध खेळ संघटना यांच्या वतीने अहिल्यानगर शहरात भव्य रॅली काढण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित होणाऱ्या उपक्रमांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, पोलीस उपअधीक्षक जगदीश भांबळ, जिल्हा ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. महावीर कटारिया, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या मनीषा पुंडे, जिल्हा ऑलिंपिक संघटनेचे सचिव शैलेश गवळी, प्रा. संजय साठे, रावसाहेब बाबर, डेव्हिड मकासरे, अल्ताफ कडकले, प्रशांत पाटोळे, आदित्य धोपावकर, सचिन गावडे, महेश आनंदकर, सुरेश वाघ, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, संतोष वाबळे, प्रियांका खिंडरे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, युवकांना खेळांचे महत्त्व पटावे व त्यांचा कल क्रीडा क्षेत्राकडे वळावा, यासाठी क्रीडा दिनानिमित्त उपक्रम राबवले जातील. रॅलीत एक हजार खेळाडू सहभागी होतील. प्रत्येक विभागाने जबाबदारी दक्षतेने पार पाडावी व उपक्रमांची अंमलबजावणी यशस्वी करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

रॅलीदरम्यान वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी पोलीस विभागाने पार पाडावी. रॅली व वाहतुकीस कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा. बँड पथक व लेझीम पथकांचा समावेश करून रॅली अधिक आकर्षक करावी. सुरक्षिततेसाठी वैद्यकीय पथक तैनात ठेवावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले, रॅलीची सुरुवात २९ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता माळीवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून होईल. माळीवाडा वेस, पंचपीर चावडी, आशा टॉकीज, माणिक चौक, तेलीखुंट, चितळेरोड-नेताजी सुभाष चौक, चौपाटी कारंजा, झारेकरी गल्ली, जुने महापालिका कार्यालय, टिळक रोड मार्गे जात ही रॅली जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर येथे समाप्त होईल. रॅलीदरम्यान खेळाडूंमार्फत सांघिक व वैयक्तिक खेळांची प्रात्यक्षिके सादर केली जातील. या बैठकीस जिल्हा ऑलिंपिक संघटना, एकविध खेळ संघटना, क्रीडा मंडळे व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरात ११ व १२ सप्टेंबरला राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलन

### राज्यातील साहित्यिकांच्या मांदीयाळीने साहित्योत्सव रंगणार, मसापच्या सावेडी उपनगर शाखेला यजमानपदाचा बहुमान

नगर - महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांच्या वतीने यंदाचे राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य नाट्य संमेलनाचे यजमानपद अहिल्यानगरच्या मसापच्या सावेडी उपनगर शाखेला मिळाले आहे. अहिल्यानगर मध्ये ११ व १२ सप्टेंबरला साहित्यिकांच्या मांदियाळीने हा साहित्योत्सव रंगणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी उपनगर शाखेला या संमेलनाचे यजमानपद नुकतेच बहाल करण्यात आले आहे. मसापच्या सावेडी उपनगर शाखा व न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने होणारे हे साहित्य संमेलन न्यू आर्टस् कॉमर्स महाविद्यालयातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज सभागृहात दोन दिवसीय संमेलन होणार आहे, अशी माहिती मसापच्या सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

माहिती देताना नरेंद्र फिरोदिया म्हणाले, मसापच्या सावेडी उपनगर शाखेने यापूर्वीही नगरमध्ये विभागीय साहित्य संमेलन यशस्वीरीत्या केले आहे. तसेच वर्षभर विविध दर्जेदार साहित्य विषयक उपक्रमांचे आयोजन केले जातात. यामध्ये मराठी भाषा दिनानिमित्त काव्यवाचन, साहित्यिकांचा गौरव, जिल्ह्यातील लेखक व कवींचा पुरस्काराने सन्मान आणि दरवर्षी वारसा दिवाळी अंकाचे प्रकाशन. या प्रमुख उपक्रमांना रसिक नगरकरांचा प्रतिसाद मिळत असतो. असे विविध उपक्रम यशस्वी केल्याच्या कामाची दखल महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मुख्य शाखेने घेतली आहे. त्यामुळेच पुन्हा एकदा सावेडी उपनगर शाखेला राज्यस्तरीय संमेलनाच्या आयोजनाचा बहुमान मिळाला आहे. ही जबाबदारी उत्तमरित्या व आश्वासक भूमिकेनेच आम्ही पार पाडणार आहोत. यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य लाभले आहे.

सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर म्हणाले, दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनाच्या आयोजनाची तयारी सावेडी उपनगर शाखेचे पदाधिकारी व न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाच्या समितीने सुरू केली आहे. अहिल्यानगर मध्ये यापूर्वी झालेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन व विभागीय साहित्य संमेलन राज्यभर गाजले होते. तोच लौकिक आम्ही या युवा नाट्य व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कायम राखू. या संमेलनामध्ये राज्यातील साहित्यिक, कवी व रसिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. यात अनेक नामवंत साहित्यिक, लेखक, कवी या संमेलनास उपस्थित राहण्यास उत्सुक आहेत.

येलुलकर म्हणाले, दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनामध्ये भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून राज्यातील नामवंत प्रकाशकांना निमंत्रणे पाठवण्यात आली आहेत. यातून नगरकर वाचकांना चांगले साहित्याची मेजवानी सहज उपलब्ध होईल. या आधीच्याही साहित्य संमेलनात पुस्तक विक्रीत नगरने नवा विक्रम नोंदवला होता. तसेच दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांची मेजवानीही नगरकरांना मिळणार आहे. यामध्ये ग्रंथदिंडी, उद्घाटन सोहळा, परिसंवाद, निमंत्रितांचे काव्य संमेलन, विशेष म्हणजे कवीकट्टा आयोजीत करण्यांत आला आहे. महाचर्चा, एकांकिका, संगीत रजनी कार्यक्रम, विविध विषयांवर परिसंवाद, जिल्ह्यातील व राज्यातील कवींचे संमेलन, नाट्य क्षेत्रातील तसेच साहित्यिकांचा गौरव व प्रकट मुलाखती, सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्य, अशा भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन सावेडी उपनगर शाखा व न्यु आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज करत आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे.

संमेलन यशस्वीतेसाठी अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीता राजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सावेडी मसाप शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सर्व पदाधिकारी, विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाची जय्यत तयारी सुरू आहे, अशी माहिती न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी दिली.

## युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या निमित्त ४ सप्टेंबर रोजी अहिल्यानगर शहरामध्ये 'राज्यस्तरीय युवा काव्य स्पर्धेचे' आयोजन

नगर - महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा मसाप सावेडी उपनगर शाखा अ. नगर व न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अ.नगर यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू आर्ट्स महाविद्यालयात होणाऱ्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या निमित्ताने युवा कवी मित्रांना विचारपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युवा कवी संमेलन व काव्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मसापचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

स्पर्धेसाठी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व युवा वर्गातील सर्व कवींनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करावी. स्पर्धा न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमधील सेमिनार हॉल येथे ४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता होणार आहेत. ज्या स्पर्धकांना या स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे, अशा स्पर्धकांनी आपली नाव नोंदणी काव्य स्पर्धा प्रमुख प्रा. गणेश भगत यांच्याकडे मोबा. ९०४९४०९८८६ या क्रमांकावर करून स्पर्धेच्या दिवशी वेळेपूर्वी उपस्थित राहावे. एका स्पर्धकाला एकच कविता सादर करता येईल कविता ही मराठी भाषेत व स्वरचित असावी, कविता सादरीकरण झाल्यानंतर कवितेची प्रत आपल्याला संयोजकांकडे जमा करावी लागेल. काव्य स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना युवा साहित्य व नाट्य संमेलनात सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच सहभागी सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन मसापचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर व न्यू आर्टस् महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मिळकतीबद्दल विद्यमान मालक यांनी विक्रीचा व्यवहार आमचे अशिलाबरोबर ठरविलेला आहे. सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक, वित्तीय संस्था अगर सोसायटीचा कर्ज बोजा नाही जामीन तारण नाही तसेच सदर मिळकतीबाबत भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिध्दीस दिली.**

**मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर,पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, अहिल्यानगर येथील महाप्रभुजी मार्ग जुना कापड बाजार भागातील खालील वर्णनाची मिळकत-दि.२८-०८-२०२५

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौ.मीटर | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| २८५५ | ५०.२ | सिटी सर्व्हे नं. २८५४ | बोळ | सिटी सर्व्हे नं. २८५६ | रस्ता |

**ही संपूर्ण जागा व त्यावरील जुने संपुर्ण बांधकाम**

विद्यमान मालक : १) श्री कुंडलिक नामदेव शिंदे २) सौ.संगीता कुंडलिक शिंदे दोघे रा. महाप्रभुजी मार्ग,जुना कापड बाजार,अहिल्यानगर.

**ॲड. उषा राजाराम जगदाळे (पटेल)**
पत्ता : हऊ श्री बंगलो,आदर्श कॉलनी ,एचडीएफसी बँक जवळ, प्रोफसर चौक,सावेडी,अहमदनगर मो : नं. ८८८८८८८१९९


# अहमदनगर महाविद्यालयातील बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि मॅनेजमेंट विभागातर्फे वेलकम फंक्शन (फ्रेशर्स पार्टी) उत्साहात



अहमदनगर महाविद्यालयातील बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि बिझनेस मॅनेजमेंट विभागातर्फे वेलकम फंक्शन (फ्रेशर्स पार्टी) उत्साहात साजरा करण्यात आला.

नगर - प्रत्येक विद्यार्थी कॉलेज जीवनातील आतुरतेने वाट पाहतो तो दिवस म्हणजे फ्रेशर्स पार्टी. अहमदनगर महाविद्यालयातर्फे फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, प्रमुख अतिथी म्हणून कॉलेजच्या अकाउंट्स रजिस्टर श्रीमती भिंगारदिवे होते. विभागप्रमुख तूषिता अय्यर यांनी स्वागत भाषण केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे मार्गदर्शन करताना म्हणाले की, विद्यार्थी जीवन हा आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. हा काळ केवळ शैक्षणिक अभ्यासापुरता मर्यादित नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची संधी आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पुस्तकातील ज्ञान पुरेसे ठरत नाही, तर संवादकौशल्य, नेतृत्वगुण, शिस्त, टीमवर्क आणि प्रामाणिकपणा यांचा संगम साधणे तितकेच आवश्यक आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास, सातत्य आणि कठोर परिश्रम हीच खरी शिदोरी आहे. ते पुढे म्हणाले की, आपण कोणत्याही क्षेत्रात करिअर निवडा, पण त्यामध्ये उत्कृष्टता मिळवण्याचे ध्येय ठेवा. फक्त नोकरी मिळवणे एवढेच आपले ध्येय असू नये, तर समाजासाठी उपयोगी ठरणारा, जबाबदार आणि सजग नागरिक म्हणून आपले स्थान निर्माण करणे गरजेचे आहे. महाविद्यालय हे केवळ ज्ञान देणारे केंद्र नाही, तर चारित्र्य आणि मूल्ये घडवणारे व्यासपीठ आहे. या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्या.

भिंगारदिवे मॅडम यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन एस.वाय. चे विद्यार्थी सृष्टी तनवर व आदित्य लगड यांनी केले. साहिल हजारी यांनी आभार मानले. कार्यक्रमामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी विविध कला गुणदर्शन सादर केले.

एफ.वाय. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये - मिस्टर फ्रेशर - शिवतेज गंडाळ, मिस फ्रेशर - स्तुती क्षत्रिय, बेस्ट पर्सनॅलिटी - अमीर शेख, बेस्ट टॅलेंट - मिताली भिंगारदिवे, कॉन्फिडंट पर्सनॅलिटी - विनायक पंडित यांनी पारितोषिके पटकावली. या स्पर्धेच्या परीक्षक प्रा. शितल कुलकर्णी व प्रा. गीता वर्मा होत्या.

या कार्यक्रमाला बीबीए विभागातील प्राध्यापक उपस्थित होते आणि या आयोजनाला त्यांचे मार्गदर्शन लाभले.


नोंदणी क्र.अे.एन.आर/अे.एन.आर/आर.एस.आर/सी आर.३२८ दि २३/८/९१

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित

पत्ता : भिंगार, अ.नगर ४१४ ००२.

## वार्षिक अहवाल-२०२४-२५

## वार्षिक साधारण सभेची नोटीस

फक्त सभासदांकरिता

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या, भिंगार अहमदनगर या संस्थेची चौतीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १४/०९/२०२५ रोजी सायं.ठिक ५.३० वाजता भाग्यलक्ष्मी सांस्कृतीक भवन, केशवनगर, भिंगार येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन **श्री. शरदराव मधुकरराव झोडगे** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करण्यासाठी आयोजीत केलेली आहे. तरी सदर सभेस संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांनी उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

* **सभेपुढील विषय :-**

१) सभेची नोटीस वाचुन नमुद करणे
२) दि. २९/०९/२०२४ रोजी झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
३) वैधानिक लेखा परिक्षण झालेल्या सन २०२४-२०२५ सालाचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.
४) नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन २०२५-२६ वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्चाची माहिती देणे व मान्यता देणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्याचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
७) सन २०२४-२५ वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकाच्या लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
८) सन २०२४-२५ वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
९) निबंधकानी जाहीर केलेल्या पॅनेलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची सन २०२५-२६ या चालु आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकामी नेमणुक करणे, लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
१०) अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचा मुशाहिरा ठरविण्याबाबत विचार विनिमय करणे.
११) पुढील वर्षासाठी कायदा/नियम यामधील तरतुदीनुसार बाहेरील कर्ज मर्यादा व जबाबदारी निश्चित करणे.
१२) कलम २४ नुसार सभासदांना प्रशिक्षण देणेबाबत.
१३) सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणे बाबत चर्चा करणे.
१४) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
**श्री. बा. सं. हजारे**
मॅनेजर
महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या, भिंगार

१. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल.
२. लेखापरिक्षण अहवाल संस्थेच्या कार्यालयात ठेवलेला असून कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
३. वार्षिक सभेच्या वेळी सभेपुढे असलेल्या विषयासंदर्भात सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. ०७/०९/२०२५ चे आत संस्थेच्या कार्यालयात मिळतील अशा बेताने पाठवावेत. आयत्यावेळी कोणत्याही प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
४. सुधारीत आदर्श उपविधी संस्थेच्या कार्यालयात ठेवण्यात आलेली असुन कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशीलांबरोबर ठरलेला असून, खाली नमुद केलेल्या विद्यमान मालकांनी आमचे अशील यांची खात्री व भरवसा देऊन कायमखूश खरेदी देणेचे ठरविले असून विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालू असल्यास अथवा दान, बक्षीसपत्र, अव्वलजप्ती, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, लीन, इजमेंट, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार वगैरे असल्यास संबंधतांनी आपल्या हरकती, तक्रारी वगैरे लेखी स्वरुपात, ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **सात (०७)** दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष आणून दाखवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलांसह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, तसेच ज्याचे सदर मिळकतीबाबत काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी सदरचे हक्क, हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशील वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. तारीख २८/०८/२०२५

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन : डि।। अहिल्यानगर सब डि ।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगांव येथील सर्व्हे नं. ५१५/१/२अ/२ ब या मधील बिनशेती प्लॉट नं. १९४ चे क्षेत्रफळ १४२.९७ चौ.मी.** यांसी चतु:सिमा येणे प्रमाणे - पूर्वेस : **१२.०० मी रुंदीचा रस्ता,** दक्षिणेस : **प्लॉट नंबर १९५,** पश्चिमेस : **ओपन स्पेस,** उत्तरेस : **प्लॉट नंबर २५** येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यामधील तदंगभूत वस्तुंसह जाणेयेणेचे हक्कासह काही एक राखुन न ठेवता मिळकत.

**उपरोक्त मिळकतीचे विद्यमान मालक**
**मयुर रामदास जगदाळे**, रा. ओंकार नगर, शाहुनगर, केडगांव, अहिल्यानगर. पिन कोड ४१४००१

**ॲड. रजनी यशवंत गायकवाड** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. मनोज यशवंत गायकवाड** नोटरी पब्लिक (भारत सरकार)
**ॲड. अमन विशाल गायकवाड** B.A.L.L.B.(DCL) (PGDIPR)
कार्यालय पत्ता :- बन्सी महाराज मिठाई समोर, कलानगर, गुलमोहर रोड,सावेडी, अहमदनगर - ४१४००३.
मो. नं. 9890009088,9890582825




गोरक्षनाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून अहिल्यानगरमध्ये गोशाळा सुरू करण्यात आली आहे.

# गोरक्षनाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरात गोशाळा सुरू

नगर - अहिल्यानगर शहरात देशी गाईंचं रक्षण, सेवा आणि संवर्धन यासाठी गोकुळ नाना आठरे यांनी गोरक्षनाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून एक गोशाळा सुरू केली आहे. चला देशी गाई वाचवू या! या संकल्पनेखाली भिस्तबाग महाल परिसरात उभारण्यात आलेल्या या गोशाळेत आजारी, भाकड आणि टाकाऊ गाईंची सेवा केली जाणार आहे. गाईंचं रक्षण म्हणजे राष्ट्ररक्षण या विचारधारेने प्रेरित होऊन गोकुळ आठरे यांनी हा उपक्रम राबविला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक शेतकरी आपली भाकड किंवा आजारी गाई खाटकाला विकतात, ज्यामुळे या गाईंची हत्या होते. मात्र, आता अशा गाईंचं संगोपन, उपचार आणि सुरक्षित निवारा भिस्तबागेतील गोशाळेत मिळणार आहे. देशी गाईंचं दूध, शेण आणि मूत्र हे भारतीय संस्कृतीचं मूळ आहे.

गाईंचं रक्षण म्हणजे आपली संस्कृती वाचवणं! हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून काम सुरू आहे. गोकुळ आठरे यांनी शेतकरी बांधवांना आवाहन केलं आहे की, आपल्या भाकड किंवा आजारी गाई विकण्याऐवजी त्या गोशाळेत आणाव्यात. गोरक्षनाथ प्रतिष्ठान त्या गाईंचं संगोपन, उपचार आणि सेवा करण्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारणार आहे. गोवंशाचं रक्षण म्हणजेच हिंदू संस्कृतीचं रक्षण! या ब्रीदवाक्याखाली ही गोशाळा सुरू झाली आहे.



सावेडी उपनगरात गुलमोहर रोड वरील मनोज गुजराथी यांनी घरगुती गणेश उत्सव साजरा करताना श्रीकृष्ण रासलीला देखावा सादर केला. यामध्ये वन्य प्राणी वाचवा हा संदेश देखील दिला. (छाया – विजय मते)




माऊली सभागृह जवळील श्री योग प्रतिष्ठानची गणेशमूर्ती.



नगर – मनमाड रोडवरील संघर्ष प्रतिष्ठानची गणेशमूर्ती.



बोल्हेगाव फाटा येथील नवज्योत युवा प्रतिष्ठानची गणेशमूर्ती.



माऊली सभागृह जवळील माऊली प्रतिष्ठानची गणेशमूर्ती.



छत्रपती प्रतिष्ठान, स्व.विठ्ठलभाऊ सप्रे मित्र मंडळाची गणेशमूर्ती.

# गणेशोत्सव : श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा महोत्सव

भारतीय समाजजीवन सण–उत्सवांनी समृद्ध असून प्रत्येक उत्सवामध्ये धार्मिकतेबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन घडते. त्यामध्ये गणेशोत्सव हा सर्वाधिक लोकप्रिय, उत्साहवर्धक आणि एकात्मतेला प्रेरणा देणारा उत्सव मानला जातो. भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत दहा दिवसांचा हा उत्सव देशभरात मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरा केला जातो.

श्री गणेश हा बुद्धी, सिद्धी आणि समृद्धीचा अधिपती मानला जातो. घराघरांत तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये गणरायाची स्थापना करून त्याची भक्तिभावाने पूजा केली जाते. सकाळ–संध्याकाळ होणाऱ्या आरत्या, प्रसादाचे वाटप, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उत्सवाचे सर्वत्र असलेले मंगल वातावरण यामुळे समाजात एक विशेष चैतन्य निर्माण होते.

इतिहासाच्या दृष्टीने पाहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्यावेळी ब्रिटिश सत्तेखाली लोकांना एकत्र येण्यास मनाई होती. परंतु गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येणे, विचारांची देवाण–घेवाण करणे आणि स्वातंत्र्यलढ्याचे बीज पेरणे शक्य झाले. त्यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता राष्ट्रीय जागृतीचे शक्तीस्थान ठरला. आजही या उत्सवाचा तो वारसा समाजाला ऐक्य व एकात्मतेचा संदेश देत राहतो.

आधुनिक काळात गणेशोत्सवाचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. विविध सार्वजनिक मंडळांमार्फत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहिमा, शैक्षणिक उपक्रम, महिला सक्षमीकरण व पर्यावरण संवर्धन यांसारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. अलीकडच्या काळात शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक रंगांचा वापर, तसेच साधेपणावर भर देणारी सजावट यांना प्रोत्साहन दिले जात आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची ही संकल्पना समाजात जनजागृती घडवून आणते आणि पुढील पिढ्यांसाठी आदर्श निर्माण करते.

गणेशोत्सव हा एक धार्मिक सण असला तरी त्यातून मिळणारा सामाजिक संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रद्धा, संस्कृती, ऐक्य, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाबद्दलची जाणीव या सर्व घटकांचा संगम या उत्सवातून दिसतो. गणरायाच्या कृपेने समाजातील वैरभाव नाहीसे होवोत, बंधुता वृद्धिंगत होवो आणि प्रत्येकाच्या जीवनात सुख–समृद्धी नांदो, हीच सामूहिक प्रार्थना असते.

गणेशोत्सव आपल्याला केवळ उत्सवाचा आनंद देत नाही, तर जबाबदार नागरिक म्हणून समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणाही देतो. म्हणूनच हा उत्सव भारतीय संस्कृतीतील एक अद्वितीय आणि कालातीत परंपरा ठरतो.

गणपती बाप्पा मोरया...! मंगलमुर्ती मोरया...!



**– संदीप बांगर शिक्षक),**
मो. ९६५७२२३३११,
श्री शाहू विद्या मंदिर
माध्यमिक विद्यालय,
खडांबे

# गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावरील धोकादायक इमारतींवर लावले फलक

**धोकादायक इमारतींखाली उभे राहू नये : महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**





नगर – महानगरपालिका प्रशासनाने शहरातील १५ अतीधोकादायक अवस्थेतील इमारती निश्चित केल्या आहेत. यात बहुतांश इमारती या मध्य शहरातील आहेत व त्यातील काहींचा वापरही सुरू आहे. या इमारती उतरवून घेण्याचे आदेश बांधकाम विभागाला दिले होते. त्यानुसार काही इमारती व काही इमारतींचा धोकादायक भाग उतरवून घेण्यात आला आहे. काही इमारतींबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने त्या काढता आलेल्या नाहीत. अशा इमारतींवर महानगरपालिकेकडून सूचना फलक लावण्यात आले आहेत. गणेशोत्सवात व मिरवणुकीवेळी या इमारतींजवळ किंवा इमारतींखाली थांबू नये, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

धोकादायक अवस्थेत असलेल्या शहरातील १९७ इमारतींना नोटिसा यापूर्वीच बजावण्यात आल्या आहेत. तसेच, १५ इमारती अती धोकादायक अवस्थेत आहेत. या धोकादायक इमारतींवर कारवाई करून सर्जेपुरा व महाजन गल्ली येथील धोकादायक इमारत उतरवण्यात आली आहे. इतरही काही इमारती व इमारतींचे धोकादायक भाग उतरवून घेण्यात आले आहे. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेमुळे काही धोकादायक इमारतींवर कारवाई झालेली नाही.

गणेशोत्सव काळात व विसर्जन मिरवणुकीवेळी अशा इमारतींच्या ठिकाणी एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी दुर्घटना घडू नये, या इमारतींच्या परिसरात कोणीही थांबू नये, यासाठी या इमारतींवर महानगरपालिकेकडून सूचना फलक लावण्यात आले आहेत. नागरिकांनी अशा इमारतींच्या खाली उभे राहू नये, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.



तालुकास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे ता.राहुरी येथील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केल्याबद्दल त्यांचा शाळेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

## तायक्वांदो स्पर्धेमध्ये शाहू विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

नगर – तालुकास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे ता.राहुरी येथील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली आहे. या स्पर्धेत १४ व १७ वर्षांखालील गटात विद्यार्थ्यांनी यश मिळवत आपल्या शाळेचा नावलौकिक वाढवला. या स्पर्धेत इ. सातवीतील जयश्री सुदाम खळेकर हिने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले. तर दहावीतील रुद्र सतीश हरिश्चंद्रे (द्वितीय) व सहावीतील गौरव लक्ष्मण हरिश्चंद्रे (तृतीय) क्रमांक मिळवून यश संपादन केले.

यशस्वी खेळाडूंचे विद्यालयाचे मुख्याध्यापक रायते एम.डी. तसेच पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक शिंदे ए.आर. तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे व उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे, व सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

जयश्री खळेकरची निवड या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे होणाऱ्या जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी झाली आहे.



## सावेडीतील विनायकराजं प्रतिष्ठाणच्या गणपतीची स्थापना

सावेडीतील गुलमोहर रोड येथील विनायकराजं प्रतिष्ठाणच्या गणेशाची स्थापना निवृत्त एयर इंडिया अधिकारी मोहित सर संगमकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष विपुल व उपाध्यक्ष विनय वाखुरे, योगेश साबळे, प्रशांत दारकुंडे, रुपेश कपिले, अनिल लगड, रुपेश कपिले, कुनाल लाटे, शंतनु कुलकर्णी, सारंग लाटे, निखिल गोसावी, सोहम साखरे, रुषी उल्हारे, साई शिंदे, अमेय डोक्रस, विशाल लोखंडे, ॲड. विक्रम वाडेकर, तनुज रोहकले, महेश थोरात, निखिल मोयल, प्रदिप कांडेकर, सुरज कर्डिले, अंश रत्नपारखी, हेमंत रासने, नंदु भोसले, ओम जरे, महाना खंडेलवाल, निलेश म्हस्के, रुपेश कटारिया, निखील मोतियानी, सुरज लोखंडे, गर्जे सर, राठोड सर आदी उपस्थित होते.

## पंडित दीनदयाल यांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचवा : विनायक देशमुख

नगर – पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे क्रांतिकारक विचार तरुण पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन पंडित दीनदयाल मानव दर्शन हीरक महोत्सव समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी केले.

महाराष्ट्र शासनाने पंडित दीनदयाल उपाध्याय यांची अंत्योदयाची संकल्पना समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी यावर्षी विशेष कार्यक्रम हाती घेतले आहेत. त्यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सवी वर्ष समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या वतीने अहिल्यानगर येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समितीचे सदस्य विनायक देशमुख बोलत होते. बैठकीस समितीचे अन्य सदस्य रवींद्र तथा राजाभाऊ मुळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, स्वर्गीय माणिकराव पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य के.ए. इनामदार व जिल्ह्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व प्रतिनिधी उपस्थित होते.



पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सवी वर्ष समितीच्या वतीने विशेष बैठकीत बोलताना विनायक देशमुख आदी.

श्री. देशमुख म्हणाले, कौशल्य विकास व रोजगार खात्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम राबविला जात असून जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सव कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात सर्वोत्कृष्ट होईल.

रवींद्र मुळे यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांची अंत्योदयाची संकल्पना विशद करताना सांगितले की, लोकशाहीमध्ये शासन, प्रशासन अथवा समाजातील जबाबदार घटकांसमोर नेहमीच समाजातील अंतिम घटकाचा विकास हे उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. या संकल्पनेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी या वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी सुनील शिंदे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले २५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमधून पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारावर आधारित निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी संस्थांचे प्राचार्य व पदाधिकाऱ्यांनी आतापासूनच नियोजन करावे.

बैठकीत जिल्ह्यातील विविध संस्थांचे पन्नास पेक्षा जास्त पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अनेकांनी आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर या स्पर्धांचा आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार आता २५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.







मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## आलमगीरमधील कचऱ्याचा प्रश्न मार्गी





नगर – नागरदेवळे ग्रामपंचायत हद्दीतील आलमगीर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून कचऱ्याचा प्रश्न गंभीर होत चालला होता. रस्त्याच्या कडेला साचलेले कचऱ्याचे ढीग आणि त्यातून निर्माण होणारा दुर्गंध यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. पावसाळ्याच्या दिवसांत या कचऱ्यातून साथीचे आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला असताना, अखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ यांच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे.

नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत सपकाळ यांनी या गंभीर प्रश्नावर आवाज उठवला. तर ग्रामविकास अधिकारी नेताजी भाबड यांचे आलमगीरमधील परिस्थितीवर लक्ष वेधले. भाबड यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश देऊन जेसीबीद्वारे कचऱ्याची साफसफाई करून घेतली.

कचऱ्याचे ढीग साचल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला होता. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या रोगांचा धोका निर्माण झाला होता. यापूर्वी देखील या भागात साथीचे आजार पसरल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे यंदाही नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु वेळीच केलेल्या स्वच्छतेमुळे आरोग्याचा प्रश्न काही प्रमाणात कमी झाला आहे.

संजय सपकाळ म्हणाले, आलमगीरमधील कचऱ्याचा प्रश्न हा नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित होता. वेळीच उपाययोजना न केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकली असती. पुढे वेळोवेळी स्वच्छता मोहिम राबवली गेल्यास हा प्रश्न पूर्णपणे आटोक्यात आणता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तातडीने दखल घेऊन कारवाई केल्याबद्दल नागरिकांनी ग्रामविकास अधिकारी नेताजी भांबड यांचे विशेष आभार मानले. साफसफाईमुळे आता परिसर स्वच्छ झाला असून श्वास घेण्यासही दिलासा मिळाला आहे, याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.



केडगाव, भूषननगर सिमेंट गोडाऊन परीसरातील विघ्नहर्ता कॉलनीमध्ये महिलांच्या हस्ते गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.



जय आनंद महावीर युवक मंडळाच्या गणपतीची पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत मिरवणूक काढण्यात आली.

## 'जय आनंद महावीर मंडळा'च्या गणपतीची पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत मिरवणूक

नगर – नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने पारंपरिक वाद्यांच्या तालावर गणरायाची स्वागत मिरवणूक काढली. मंडळाची चांदीची गणेश मूर्ती तसेच उत्सव मूर्ती विद्युत रोषणाई असलेल्या रथात ठेवण्यात आला होता. ढोल पथकाने बहारदार वादन करीत गणरायाचे उत्साहात स्वागत केले. बाजारपेठेतील प्रमुख मार्गांवरुन निघालेली ही मिरवणूक पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती.

मिरवणुकीनंतर मंडळाच्या चांदीच्या गणेश मूर्तीची तसेच उत्सव मूर्तीची विधीवत पूजा करून मंडळाचे ज्येष्ठ सदस्य प्रकाश गांधी व ललित बनभेरु यांच्या हस्ते प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सेक्रेटरी आनंद मुथा, उपाध्यक्ष संतोष कासवा व राहुल सावदेकर, कुंतीलाल राका, अमित मुथा, हेमंत मुथा, प्रमोद गांधी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

शैलेश मुनोत म्हणाले की, मंडळाच्या गणेशोत्सवाला मोठी परंपरा आहे. उत्सवाचे पावित्र्य राखून विधायक उपक्रम राबवून दरवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो. यंदा राजमाता जिजाऊ यांची सुवर्ण तुला हा भव्य दिव्य देखावा साकारण्यात आला आहे.

आनंद मुथा म्हणाले की, दर वर्षी प्रमाणे अतिशय आनंदी वातावरणात गणरायाचे स्वागत करताना कार्यकर्ते उत्साहीत झाले होते. मंडळातर्फे गणेशोत्सव विधायक उपक्रमांनी साजरा करण्यात येतो. सर्व गणेश भक्तांना अतिशय आनंदी वातावरणात उत्सवाचा आनंद मिळावा यासाठी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते प्रयत्नशील असतात.

प्रमोद गांधी म्हणाले, मंडळाने यंदाही उत्साही वातावरणात गणेश प्रतिष्ठापना केली आहे. आकर्षक चौक सजावट करून गणेश भक्तांचे स्वागत करण्यात येत आहे. लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवात कार्यकर्ते महत्वाचे असतात. आमच्या मंडळात तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. यंदाही सर्व कार्यकर्ते उत्साहात असले तरी योगेश (गुड्डु)मुनोत यांची उणीव यंदा प्रत्येकालाच जाणवत आहे.

